# मोटार अपघात दावा अर्ज क्र.९/२०१५ मधील नि.६ खालील आदेश

CNR No. MHST01-002978-2014

अर्जदार यांनी नुकसान भरपाई मिळण्यासाठी मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम १६६ नुसार केलेल्या मुख्य अर्जात या अर्जाद्वारे त्या अधिनियमाखालील कलम १४० नुसार अंतरिम नुकसान भरपाई मिळण्याची मागणी केलेली आहे.

२. अर्जदारांचे कथनानुसार दि.२९/०६/२०१४ रोजी सायंकाळी ०७.१५ वाजताचे सुमारास अर्जदार क्र.१ व २ यांचा मुलगा, अर्जदार क्र.३ यांचे पती आणि अर्जदार क्र.४ व ५ चे पिता धीरज दिलीप येवले, रा.मु.पो. किन्हई, ता. कोरेगांव, जि. सातारा हे मोटार सायकल क्र. एम.एच.११/एक्स.२५३४ वरुन किन्हई ते सातारा रोड रस्त्याने जात होते. त्यांची मोटार सायकल खंदारे वस्ती फाटा येथे आली असता पीक अप क्र.एम.एच.११/ए.जी. ७६५९ च्या चालकाने जीप निष्काळजीपणे, भरधाव वेगात चालवून मोटार सायकलला धडक दिल्याने अपघात झाला आणि त्या अपघातामध्ये धीरज दिलीप येवले गंभीररित्या जखमी होवून मयत झाले. अपघाताचे वेळी सदर जीप सामनेवाला यांच्या मालकीची होती आणि या वाहनाचा विमा उतरविलेला नसल्याने सामनेवाला हे नुकसान भरपाई देण्यास जबाबदार आहेत.

३. सामनेवाला यांनी म्हणणे दाखल केले नाही.

४. अर्जदारांनी यादी नि. ४ सोबत हजर केलेले अपघाता संबंधीचे कोरेगांव पोलीस ठाणे मधील दि.०१/१०/२०१४ रोजी नोंदविलेल्या गु.र.क्र.१५९/२०१४ मधील प्रथम वर्दि अहवाल, घटनास्थळ पंचनामा यावरुन अर्जदाराच्या कथनाप्रमाणे वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी अपघात झाल्याचे आणि सदरहू वाहने त्या अपघातात सामील असल्याचे सकृतदर्शनी स्पष्ट होते.

५. अर्जदार यांनी हजर केलेल्या शव विच्छेदन अहवालावरुन असे स्पष्ट होते की, धीरज दिलीप येवले यांचा अपघातामध्ये गंभीर जखमी झाल्यामुळे मृत्यू झालेला आहे. वरील सर्व परिस्थितीत अर्जदार कलम १४० अन्वये अंतरिम नुकसान भरपाई

मिळण्यास पात्र आहेत आणि सामनेवाला हे अपघातातील वाहनाचे मालक असल्याने सदर नुकसान भरपाई देण्यास जबाबदार आहेत. सबब, खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

## आ दे श

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. सामनेवाला यांनी नुकसान भरपाई म्हणून रक्कम रु.५०,०००/- (रु. पन्नास हजार फक्त) या आदेशापासून ३० दिवसांचे आत अर्जदारांना रेखांकित धनादेशाद्वारे द्यावेत. त्यापैकी अर्जदार क्र.३ यांना र.रु.२०,०००/- (रु.वीस हजार फक्त), अर्जदार क्र.१ व २ यांना प्रत्येकी र.रु.१०,०००/- (रु.दहा हजार फक्त) आणि अर्जदार क्र. ४ व ५ यांना प्रत्येकी र.रु.५,०००/- (रु.पाच हजार फक्त) रेखांकित धनादेशाद्वारे द्यावेत. अर्जदार क्र.४ व ५ अज्ञान असल्याने त्यांच्या हिश्याची रक्कम अज्ञान पालन कर्ता म्हणून त्यांची आई अर्जदार क्र.३ समृध्दी धिरज येवले यांना रेखांकित धनादेशाद्वारे देण्यात यावी. सदरहू रक्कम मुदतीत न दिल्यास त्यावर अर्ज दाखल तारखेपासून संपूर्ण रक्कम फिटेपर्यंत द.सा.द.शे. ७.५ टक्के दराने व्याज देण्यास सामनेवाला जबाबदार राहतील.

३. येणेप्रमाणे अंतरिम निवाडा करण्यात यावा.

सातारा
दिनांकः २५/०४/२०१९

( राजेंद्र द. सावंत )
अध्यक्ष, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण
सातारा.